| Published Date: | 29 Aug 2018 | Publication: | Deshonnati (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Nagpur | Page No: | 2 |
| MAV/CCM: | 8666.4/9.42 | Circulation: | 40000 |

# टीसीएस आयटी विझची आवृत्ती ४ सप्टेंबरला

*प्रतिनिधी / २८ ऑगस्ट*

**नागपूर :** टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेस (टीसीएस) आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने टीसीएस आयटी विझ २०१८ या भारतातील शालेल मुलांसाठी प्रश्नमंजूषेच्या नागपूर आवृत्तीची घोषणा केली. ही स्पर्धा मंगळवार दिनांक ४ सप्टेंबर रोजी सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात घेतली जाणार आहे.

वर्ग ८ ते १२ वीत शिकणारे विद्यार्थीच स्पर्धेत भाग घेण्यास पात्र आहेत. प्रत्येक शिक्षणसंस्था एक किंवा एकाहून अधिक संघ पाठवू शकते. प्रत्येक संघात दोन स्पर्धक असतील कोणतेही प्रवेश शुल्क नाही.

प्रश्नमंजुषेचे स्वरूप- लेखी प्राथमिक फेरीतील पहिले सहा संघ प्रादेशिक अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील. अंतिम फेरीत विजयी संघ राष्ट्रीय अंतिम फेरीत प्रवेश करेल. प्रादेशिक विजेत्याला ६० हजार मूल्याचे गिफ्ट व्हाउचर बक्षीस म्हणून देण्यात येईल तर उपविजेत्यांना ४० हजाराचे गिफ्ट व्हाउचर दिले जातील. याशिवाय ट्रॉफी आणि पदके दिली जातील. प्रत्येक शहरातील प्रादेशिक अंतिम फेरीमध्ये सर्व स्पर्धकांसाठी एक ट्विटर स्पर्धा घेण्यात येईल.